प्रकरण १

आदिपुराण लघु प्रबंध

प्रास्ताविक :

मानव जातीचा इतिहास हा अनेक प्रकारे लिहिला जातो. अर्थात प्रतिपादकाच्या दृष्टिकोनातूनच इतिहासाच्या लेखनाचा आकार निश्चित होतो. इतिहास कधी तत्वज्ञानाचे रुप धारण करतो, तर कधी दिव्येतिहासाच्या वेषांत पुढे येतो, कधी तो शिलूपाच्या रुपाने दिसतो, तर कधी स्मृती, पुराण इत्यादी स्वरुपात आपल्याला ओळख देतो (१)

जगातील प्रगत अणि प्राचीन सर्व धार्मिक समाजामध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरुपात आढळणारे विशिष्ट प्रकारच्या पवित्र कथा या अर्थाने 'पुराण' या पदाचा अभ्यासकाने विचार केलेला आहे. पुराणाचा व निसर्गाचा जवळचा संबध आहे. तसाच पुराणाचा समाजशास्त्राचा, निसर्गाचा जवळचा संबध आहे. तसाच पुराणाचा समाजशास्त्राचा, नितीशास्त्राचा अत्यंत जवळचा संबध आहे. जैन, हिंदू, बौध्द, यहुदी, ख्रिस्त, इस्लाम या विद्यमान धर्मातील कथांमुळे पुराणांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

विश्वोत्पत्तीच्या पुराणकथा जगातील महत्वाच्या सर्व धर्मात व प्रगत अशा भाषेत पहावयास मिळतात, त्यामुळे मानीव जीवन आणि पुराण कथा यांचा अतुट संबध पहावयास मिळतो.

जैन साहित्य, चार भागात विभागलेले आहे. या चार भागाला 'अनुयोग' म्हणतात. या चार विभागांची नांवे प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग, द्रव्यानुयोग असे आहे.

प्रथमानुयोगात :- संसाराची पाप-पुण्यांचे फल, महान पुरुषांची प्रवृत्ती इत्यादीचे विवेचन आहे (२)

करणानुयोगात:- जीव कर्मांचे तसेच त्रिलोकादि रचनेचे वर्णन असुन जीवांना धर्मांत मग्न करण्याचा प्रयत्न केलेला आहे

चरणानुयोगात :- विविध प्रकारच्या धर्मांची साधने कथन करुन जीवांना धर्मरत करण्याचा प्रयत्न केला आहे. (३)

द्रव्यानुयोगात :- द्रव्य व तत्त्वाचेविविचन आहे (४)

प्रथमानुयोगात 'पुराण' साहित्याचा समावेश होतो पुराणात महापुरुषांची जीवन चरित्रे रेखाटलेली आहेत. जैन इतिहाचा प्रथम प्रवाह म्हणून पुरण साहित्याला मानण्यात येते. (५)

पुराणाबद्दलचे भारतीय विचार :-

१. जिनसेनाचार्यांनी पुराणाला 'सत्कथा' म्हटले आहे.

२. भारतीय धर्म ग्रंथामध्येपुराण शब्दाचा प्रयोग इतिहासा बरोबर घेतला. जातो. कितीतरी लोकांनी इतिहास व पुराणाला 'पंचम वेद 'मानले आहे. (६)

३. 'पुरा विद्यते इति पुराणम्' - वायुपुराण

४. ' पुरा ' अर्थ होतो परंपरा - पद्मपुराण

५. परंपरेच्या निबंधनाला ' पुराण ' अशी संज्ञा दिली जाते - पद्मपुराण

६. प्राचीन काळात 'असे झाले होते ' याच्यावर भर दिल्याने पुराण संज्ञेचे सार्थक होते. - ब्रम्हाण्डपुराण

७. प्राचीन कथेला नवे रुप दिले जाते त्याला पुराण म्हणतात. - निरुक्त

८. 'पुरातनं पुराणं स्थानं ' असे आदिपुराणात म्हटले आहे. प्राचीन आख्यानास पुराण म्हटले आहे. (७)

९. पुराण या शब्दाचा अर्थ प्राचीन असा घेतला जातो. पुर्वा + अन् अर्थात अस्तित्वात असणे. प्राचीन काळी नवे असणारे ते पुराण परंपरेची इच्छा करणारे ते पुराण.

१०. जिनसेनांनी पुराणास ' सत्कथा', असे म्हटले आहे. कथा सात प्रकारची आहे. द्रव्य, क्षेत्र, तीर्थ, काल, भाव, महाफल, प्रकृत या सात अंगानी युक्त आहे. (८)

११. जिसेनांनी पुराणाची जी व्याख्या केली व वर्ण्य निरुपणाच्या दृष्टीकोनातून असे निश्चित लक्षात येते की, विष्णु पुराणाधिकामध्ये 'पुराण पंचधा ' म्हणून म्हटले आहे. सत्पुरुषाला जैन पुराणामध्ये शलाका पुरुष म्हणतात. यामध्ये विव्दत्तेचे प्रतीक ऋषीमुनींच चरित्र व चक्रवर्ती राजादिकांचे चरित्र सांगितले जाते. (९)

१२. पुराणाचा मुख्य उद्देश मनोंरजनासह उपदेश हा आहे. इतिहास संशोधन नाही. देवतांचे अद्‌भुत अवतार आणि ऋषींचे वर व शाप हे वैदिक पुराणाच्या रुढी आहेत. तर मोठया संख्याचा वापर आणि अनेक जन्मांच्या कथा या जैन पुराणाचे मुख्य वैशिष्ठये आहेत. (१०)

१३. जिनसेनांनी पुराणाला 'धर्मांनुबधिनी कथा ' असे म्हटले आहे. (११)

१४. ज्यात सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर, वंशपरंपरा याचे वर्णन पहावयास मिळते त्याला पुराण असे म्हणतात. (१२)

१५. सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वन्तर, वंशानुचरित हे पाच लक्षण पुराणाचे कोषाकारांनी सांगितले आहेत.

१. सर्ग - म्हणजे ज्यावेळी मुळ प्रकृतीत असलेले गुण क्षुब्ध होतात. त्यावेळी महत्वाची उत्पत्ती होते महत्‌तत्वापासून तामस, राजस, सात्विक तीन प्रकारचे अहंकार होतात.

इन्द्रीये व इन्द्रियाचे विषय याची उत्पत्ती या उत्पत्तीच्या क्रमाला ' सर्ग ' नांव आहे.

२. प्रतिसर्ग - सर्गाच्या उलट म्हणजे प्रलय होय. ब्रम्हाण्डाचा स्वाभाविकरित्यां प्रलय होते. तो नैमित्तिक , प्राकृतिक नित्य आत्यन्तिक असतो. त्याला प्रतिसर्ग म्हणतात.

३. वंश - ब्रम्हदेवापासून उत्पन्न झालेल्या राजाच्या भुतकालीन, वर्तमानकालीन तसेच भविष्यकाली संतान परंपरेला वंश नांव आहे.

४. मन्वन्तर - मनू, देवता, इंद्र, सप्तर्षी, भगवान विष्णुचे मनुंपुत्र अंशावतार या सहांचा अंतर्भाव ज्यात होतो अशा काळास मन्वन्तर म्हणतात.

५. वंशानुचरित - पुर्वी वर्णन केलेल्या वंशात, उत्पन्न झालेल्या वंशजाचा, त्याचप्रामणे त्या त्या वंशाचे मुळ पुरुष ठरलेल्या राजाचा इतिहास तसेच त्याच्या चरित्राचे वर्णन म्हणजे वंशानुचरित होय. (१३)

या पाच लक्षणाचा उल्लेख जैन व वैदिक पुराणातही येतो. (भारतीय साहित्याचा इतिहास भाग १ पृष्ट क्रमांक ३६)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पुराणाबद्दलचे परकीय विचार -

'पुराण ' किंवा Myth's या शब्दाचा अर्थ त्याचे महत्व अनेक परकिय विचारवंतानी दिलेले आहे.

Myth is collective term used for one of symbolic communication and specifically indicates one basic form of religious symbolism as distinguished from symbolic behavior and symbolic places or objects (such as temples and coins) Myth's are specific accounts concerning gods or super human being's and extraordinary events or circumstances in a time that is altogether different from that of ordinary human experiences. (१४)

It is very difficult to define in a way that would be expectable to all scholar and same time intelligible to non specialist Myths is an extremely complex cultural reality what can be explained and preached.

Mythology - The Science which examines myths or legends of cosmogony Gods and Heroes, It is also used as a term for these legends themselves. This mythology of Greek

means the body of Greek divines and heroic and cosmogonies Legends. (१५)

जपानमध्ये पुराण कथेवर विश्वास ठेवणारे बहुसंख्य आहेत. त्यांच्या दैनंदिन जीवनांवर पुराण कथेचा प्रभाव आहे. जपानी वाङ्मयाची सुरुवात पाचव्या शतकात झाली असे मानतात. त्यांचे 'कोजिकीको' 'निहोंजी' हे दोन्ही ग्रंथ पुराण ग्रंथ आहेत. अर्थात पुराण म्हणजे ज्यात दंतकथा , काल्पनिक वर्णने यांची खैरातच आसते. यात राजदरबारातील लोकांनी त्यांच्या खानदानी आयुष्याबद्दल लिहिले आहे. पुराण कथेतील नेमून दिलेल्या संस्काराप्रमाणे संस्कार प्रत्यक स्त्री पुरुष नवीन पिढीवर करत असते. (१६)

चीनमध्ये सांस्कृतिक व धार्मिक परंपरांचा मोठा वारसा जोपासला गेला. कन्फयुशिअस या गौतम बुध्दाच्या समकालीन असणाऱ्या तत्ववेत्त्याच्या कथा हजारो वर्ष समाजावर परिणाम कारक ठरल्या. (१७)

महापुराणाविषयी भारतीय विचार -

१. पुराण काळातील महापुरुषांच्या बाबतीत ज्या गोष्टी सांगितल्या जातात, ज्या उपदेशिल्या जातात त्यांना 'महापुराण ' असे म्हणतात.

२. ऋषीमुनींनी परंपरेने चालत आलेल्या कथांना महापुराण म्हटले आहे. हे महापुराण ऋषि-प्रणीत असल्याने त्याला ' आर्ष' म्हणतात. पुराणातून धर्माचा उपदेश केलेला असतो म्हणून त्याला धर्मशास्त्रही म्हणतात.

३. इति + अ + हास (आसीत्) अशी कथा झाली होती. या वर भर असल्याने त्याला इतिहासही संबोधता येईल. दुसऱ्या शब्दात यालाच ' इतिवृत्त' अशी म्हणण्याची प्रथा आहे.

४. पुराणातील कथा किंवा पुराण्या कथा महापुरुषाकडूनं अथवा आचार्याकडूनं उपदेश रुपाने सांगितल्या जातात त्याला महापुराण म्हणतात. पुराणाचे नायक महापुरुष असतात. त्यांच्या कथनाने लोक जीवनाचा उत्कर्ष व अभ्युदय होणे शक्य असतो असे आदिपुराणात म्हटले आहे.

५. उदा रामायणकार महर्षि वाल्मिकीने नारदापुढे अशी इच्छा व्यक्त केली की, जो

कोणी त्रिलोकी बलवान, धर्मज्ञ, सत्यवाक् , दृढव्रती, सर्व जीवांचा हितकारी, क्रोधाला जिकंणारा, ईर्ष्यारहीत असणाऱ्याचे चरित्र मला सांग, म्हणूनच नारदाने रामाचे चरित्र सांगितले. याचाच अर्थ महापुराणात, महापुरुषाचे चरित्र असते. (१८)

६. महापुराणाची तुलना आदिपुराण, रामायण, महाभारत व सम्राट भरत-

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

चक्रवर्तीच्या चरित्रांशीच करता येईल. कारण माणसाच्या कैक पिढ्यानपिढया येतात व जातात परंतु अनेक पिढयांना प्रभावित करण्याची क्षमता अशा महापुराणात असते. (१९)

महापुराणात चोवीस तीर्थंकराची चरित्रे लिहीली आहेत. वैदिक धर्मात अवतारी पुरुषांचे जे स्थान असते, तेच जैन धर्मात तीर्थंकराचे असते. (२०)

आदिपुराणात प्रथम तीर्थंकर नाभीराजपुत्र वृषभनाथचा किंवा आदीनाथाचा जन्म झाला. तीर्थंकरात प्रथम, आदी, आद्य होते. त्यांना 'पुरु' म्हणुनही ओळखत असत. त्यांना १०१ मुले व २ मुली होत्या. - त्यापैकी प्रथम पुत्र भरत हा पहिला चक्रवर्ती होता. तो षट्खंडाधिपतीही होता. भरत चक्रवर्तीच्या नावावरुन आपल्या देशाला भारत नांव दिले. वृषभनाथापासून कृतयुगास सुरुवात झाली. भरतावर राज्य सोपवून वृषभनाथानी दिगंबर दिक्षा घेतली. तपस्या करुन त्याना पराकोटीचे ज्ञान झले. त्या ज्ञानाला ' केवलज्ञान ' म्हणतात. 'केवलज्ञान 'झाल्यानंतर 'केवलकल्याण' उत्सव लोकांनी साजरा केला आणि भगवंतानी भव्य जीवानां हितोपदेश केला. यावरुन तीर्थंकराची महती पटते. (२१)

७. 'आदिपुराण' हा ग्रंथ अत्यंत प्राचीन कालापासून प्रचलीत आहे, म्हणून त्याला पुराण म्हणतात. त्याच्यामध्ये महापुराण तसेच तीर्थंकर आदी महापुरुषांचा

उपदेश वर्णन केलेला असतो किंवा याच्या वाचनाने फार मोठे कल्याण होते म्हणून याला महापुराण म्हणतात. हे पुराण महापुरुषाच्या सबंधीत असून स्वर्ग मोक्षास कारण होत असल्याने याला ऋषीमुनी महापुराण म्हणतात. (२२)

वास्तविक आदिपुराण म्हणजे प्रथम पुराण असा शब्दश: अर्थ उचीत वाटत नाही. आदिचा अर्थ श्रेष्ठ असाच करावयास हवा, म्हणून याला श्रेष्ठपुराणही म्हणता येईल. (२३)

आदिपुराणाच्या कालासंबधी -

पुराणाचा काल कोणता ? या प्रश्नांसंबधी अनेक विद्वानांची अनेक मते आहेत.

पुराणात पलय, सागर, उत्सर्पिणी, अवसर्पिणी, सुखमा, दु:खमाकाल, संख्यात, असंख्यात वर्षाचा उल्लेख येतो. यामुळे आधुनिक वैज्ञानिक, ऐतिहासीक तथ्याचे समाधान होत नाही. ही बाब फक्त जैन पुराणाच्या बाबतीत म्हणता येणार नाही.

वैदीक परंपरेत सात्य, येत, द्वापार, त्रेता, कलीयुग याबबतही तसेच म्हणता येईल. असंख्यात वर्षाचा उल्लेख येतो.

आधुनिक विद्वानांनी भाषा विषयावर आधारीत भारतीय साहित्याचा कालक्रम निश्चीत केला आहे. सर्वात प्राचीन ग्रंथ ऋग्वेद मानला. जैन

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पुराणाच्या दृष्टीने ऋग्वेदाचे सूक्त (१०/१३६) महत्वाचे आहे. त्यात वातरशना मुनीची स्तुती केली. वातरशना मुनी नग्न होते. ते जटा धारण करत होते. स्नान करत नसत, मौनवृत्तीने राहत हे सर्व गुण वैदिक ऋषिपेक्षा वेगळे होते. सर्व मुनीत 'केशी' मुख्य होते. (ऋचा १०/१०२/६) मध्ये केशी किंवा वृषभ विशेषण, विशेष्याच्या रुपात आहेत. नाभि व मरुदेवीचा पुत्र वृषभ विष्णुचे अवतार होते असा उल्लेख भागवत पुराणात (५/३/२०) येतो. (वेदाची रचना इ.स. दीड हजार वर्षाच्या पूर्वी झाली . आदिपुराणाची कथा त्यापूर्वीच झाली असावी.) [२४]

आदिपुराणाचा ग्रंथकर्ता जिनसेनाचार्य यांचा जन्म शक सवंत ६७५ मध्ये झाला असा अनुमान आहे. त्यांचे आयुष्य ८५ ते ९० वर्षाचे होते. या कालात त्यानी वर्धमान पुराण व आदिपुराण ही पुराणे लिहिले. मात्र आदिपुराण त्यांच्या कडून पूर्ण झाले नाही. आदिपुराणाचे ४७ पर्व आहेत. त्यापैकी त्यांनी स्वतः ४२ पर्व व ४३ पर्वातील पहिले तीन श्लोकांची रचना केली. बाकीचे त्यांच्या पश्चात त्यांचे शिष्य गुणभद्राचार्यांनी पाच पर्व व उत्तरपुराण रचले. [२५]

'आदिपुराण' जैनाचार्यांनी केंव्हा सुरुवात केली ? केंव्हा समाप्ती केली. याची तीथी निश्चीत सांगता येत नाही. जिनसेनाचार्यांना



ओरिसा येथील २२०० वर्षापूर्वीचासम्राट खारवेल यांच्या हत्ती गुफे तील ब्राम्ही लिपीत कोरलेला शिलालेख

आदिपुराणातील दहा हजार श्लोक पुर्ण करण्यास दहा वर्षे लागली असतील. असे प्रस्तावनाकार पन्नालाल जैन यांनी उल्लेख केला आहे. (२६)

श्री व्हिसेंट ए. स्मिथ् - यांच्या मते मथुरेला मिळालेली ऐतिहासीक सामुग्री जैनमत समर्थनावर बराच प्रकाश टाकून जैन धर्माच्या प्राचीनतेबाबत भरभक्कम पुरावे उपस्थित करतात. या शिलालेखा पेक्षाही प्राचीन व महत्वपुर्ण असा शिलालेख खंडगिरी, उदयगिरी (ओरिसा) गुंफेत सापडला आहे हा लेख जैनसम्राट खारवेलने लिहविला होता. यावरुन भगवान ऋषभदेव अवसर्पिणी कालाच्या तिसऱ्या भागात झाले. त्या कालाचा आता पाचवा भाग चालू आहे. म्हणून त्यांना होऊन लाखो-करोडो वर्ष होऊन गेली.

हिंदू मान्यतेप्रमाणे जेंव्हा ब्रम्हदेवाने सृष्टीच्या आरंभी मनु व सत्यरुपास जन्मास घातले तेंव्हा भगवान ऋषभदेव त्यांच्या नंतर पाचव्या पिढीत आले. व याप्रमाणे ते पहिल्या सत्ययुगाच्या शेवटी झाले, आता पर्यंत २८ सत्ययुगे झाली. यावरुन प्राचीनतेची कल्पना करता येते. यावरुन जैन धर्माचा अस्तित्वकाल फार प्राचीन आहे. (२७)

जर ऋग्वेदात आदिनाथाचा, वृषभनाथाच्या प्राचीनतेविषयी विचार करता येईल.

पुराणाचे स्वरुप - जैन व हिंदू-

जैन पुराणाचे स्वरुप - जैन पुराणाचा समावेश प्रथमानुयोगात होत असून, तो जैन इतिहासाचा प्रथम प्रवाह मानण्यात येतो. जैन मुर्नीनी महापुरुषाच्या चरित्र्याची रचना केली जेंव्हा हिंदूच्या पुराण ग्रंथाची रचना केली व रामायण महाभारत यांची लोकप्रियता वाढू लागली, त्याचवेळी जैन विद्वानांनी राम, कृष्ण, विविध तीर्थंकर यांच्या जीवन चरित्राविषयी लिखान केले. पुराणात त्रेसष्ट शलाकापुरुष चरित्रात चोवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ वासुदेव, नऊ बलदेव, प्रतिवासुदेव यांचा समावेश केला आहे.

जैन जीवन पद्धतीत पुराणाचे अतिशय महत्व असल्याचे आढळते त्यामुळेच पुराण साहित्य सर्वसाधारण माणसाच्या श्रध्देचे एक अपूर्व ठिकाण होऊन बसल्याचेही दिसते. पुराणात महापुरुषाच्या घटित घटनांच्या उल्लेखाबरोबर त्यापासून मिळणारे फलाफल , पुण्य-पाप याचेही वर्णन आढळते. नैतिक, धार्मिक भावनांचे वर्णन विशद केलेले असून हितोपदेशाचे महान कार्य पार पाडले जाते. म्हणूनच भारतीय साहित्यात पुराण साहित्याचे अनन्यसाधारण स्थान आहे. (२८)

'पुराणे धर्मनिश्चय:' पुराणा पासून धर्माचा निश्चय केलेला पहावयास मिळतो. जैन अभ्यासक पुराणाचा एक वेगळया दृष्टीकोणातून विचार

करतात. पुराणे आपत्कालात धैर्यबल देऊन लोकांना धर्म नितीचा मार्ग कसा उपयुक्त आहे याचे स्पष्टीकरण देतात.

पुराणात बदल कसे घडले ? हे बदल केवळ भारतीय स्तरावरच आहेत असे नाही तर प्रचलीत अशा प्रगत धर्मात पुराणात बदल झालेले पहावयास मिळतात. कित्येक पुराणात अभिमान्याने पंथीय अभिनिवेशाने भेद भाव निर्माण केले आहेत.

'आदिपुराण' हा जैन परंपरेतील सर्वोत्कृष्ठ असा ग्रंथ मानला जातो. यात काव्याबरोबर महाकाव्याची देखील संपूर्ण वैशिष्टये आढळतात. स्वतः कविने या पुराणाला 'धर्मानुबंधिनी 'कथा असे म्हटले आहे. जो पुरुष यशरुपी धनाचा संचय आणि पुण्यरुपी पुण्याचा व्यवहार करु इच्छितो त्याच्यासाठी धर्म कथेचे विवरण करणारा हा ग्रंथ मुलधनाप्रमाणे आहे. म्हणूनच या ग्रंथाला संस्कृत पुराण साहित्यातील एक मौल्यवान रत्न मानले आहे.

आदिपुराणाच्या प्रस्तावनेत सिद्सेन, समंतभद्र, श्रीदत्त, प्रभाचंद्र, शिवकोटी जयाचार्य ऋणभिक्षु, भट्टकलंक, श्रीपाल, पाञ्चकेसरी, वादीभसिंह, वीरसेन, जयसेन वगैरे आचार्यांची स्तुती केली आहे. गुणाढयाच्या वृहत्कथेचाही उल्लेख आहे. आदिपुराणात 'आदिनाथ' या कथानायकाचे चरिञचिञण हृद्य स्पर्शी आहे.

हिरवा शालू पांघरुण बसलेली पृथ्वी अथवा मंद मंद शीतल वायु लहरी, फुलांनी बहरुन आलेल्या पुष्पवेली खळखळ आवाज करीत वाहणारी सरिता, कमल ताटव्याने युक्त सरोवर, उंचच् उंच पहाड, सूर्योदय, सूर्योस्त, चंद्रोदय अशा गोष्टीचे इतके मार्मिक व सुंदर वर्णन केलेले आहे की, वाचक देहभान हरवून बसतो.

'उत्तरपुराण' हा महापुराणाचा दुसरा खंड आहे. रचना गुणभद्राचार्यांनी केली. अजिनाथापासून तेवीस तीर्थंकर, अकरा चक्रवर्ती, नऊ नारायण, नऊ प्रतिनारायण, जीवंधरस्वामी इत्यादि विशिष्ट पुरुषांची चरिञे अगदी थोडक्यात व शास्त्रोक्त पद्धतीने सांगण्यात आली आहेत. उत्तरपुराणातील अडसष्टव्या पर्वात 'रामचरिञ' आहे. दशरथ राजा त्याची पत्नी , राम, लक्ष्मण, राम-सीता विवाह , सीतेचे रावणाकडूनं हरण, लक्ष्मणाचे मरण वगैरे विविध वर्णन आहेत.[२९]

पूर्वीपासून पुराण साहित्य सर्वसाधारण जनांचे भक्तीस्थान, श्रध्दास्थान, चेतनास्थान असल्यामुळे या साहित्याला महत्व आहे. जीव जगण्याच्या धडपडीत संसार समस्या सोडवता सोडवता हैराण झालेल्या जीवाला पुराण साहित्यातील हितोपदेशाने मनाला विरंगुळा मिळतो व ऐकणाऱ्याचे मन प्रफुल्लीत, चैतन्यमयी, संयमी होते. हाच खरा पुराणाचा विजय होय.[३०]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आदिपुराणाचे स्वरुप - 'आदिपुराणाचे' कथानायक तीर्थंकर ऋषभदेव व त्यांचे पुत्र भरत चक्रवर्ती आहेत. या दोन शलाका पुरुषांच्या जीवनाशी संबधीत असणाऱ्या कथा आहेत. या ग्रंथाची कथा सत्तेचाळीस पर्वात रचली आहे. पहिल्या दोन पर्वात वक्ता, श्रोता, लक्षण, पुराण श्रवणफल।इत्यादिचे वर्णन आहे.

शेवटचे कुलकर नाभिराजाच्या वेळी कल्पवृक्ष होते. परंतू कालातंराने ते नष्ट झाले. त्यामुळे प्रजेची व्याकुळता वाढली. प्रजा दुःखी होऊन नाभिराजाकडे येतें. त्यांनी प्रजेला धान्य, फळे इक्षुरस इत्यादिचा उपयोग कसा करावा याचे ज्ञान दिले. नंतरच्या पर्वात गांधील देशाचे वर्णन आहे. या नगरीचा राजा अतिबल विद्याधर व त्याची राणी मनोहरा यांचे वर्णन आहे. अतिबलाने विरक्तीनंतर महापाल या त्याच्या मुलाला राज्य दिले. ते राज्य,त्यांचे मंत्रिमंडळ , राजा चैनी विलासी होते. नंतरच्या पाचव्या पर्वात महाबलाची विरक्ती व सल्लेखनाचे वर्णन आहे. तप प्रभावाने महाबल स्वर्गात ललितांग नावाचा देव झाला. पंचणमोकार मंत्राच्या प्रभावाने पुष्कलावती देशातील उत्पलखेट नावाच्या नगराचा राजा वज्रबाहु झाला. त्याची पत्नी स्वयंप्रभा मृत्यू पावून पुण्डलिकीनी नगरीच्या राजाच्या घरी श्रीमती नावाची मुलगी झाली. तिला पूर्वभवाचे स्मरण झाले. ती ललितांगाच्या प्राप्तीसाठी व्रतसंकल्प करु लागली.

सातव्या पर्वात ललितांग वज्रसंघ महापूत म्हणून चैत्यालयात येतो. त्यालाही पूर्वभवाचे स्मरण होते.

आठव्या पर्वात वज्रसंघ चारणमुनींना आहारदान देतो तेंव्हा मुनिकडून त्याला पूर्वभव ऐकायला मिळते.

नवव्या पर्वात सत्पात्र दान' दिल्याने उत्तर कुरुमध्ये आर्य-आर्या झाले. प्रीतींकर मुनीच्या सानिध्याने ते देव झाले.

दहाव्या सर्गात प्रीतींकरांच्या केवल ज्ञानाचे वर्णन आहे. तर अकराव्या सर्गात वज्रनाभीचे वर्णन आहे. (३१)

बाराव्या सर्गात अहमिंद्राचा जीव ऋषभदेव म्हणून जन्माला आला. तेराव्या सर्गात आदि भगवंताच्या जन्माभिषेकाचे वर्णन आहे. चौदाव्या सर्गात इंद्राणी द्वारे मातेस बाळाला सोपविणे व त्याचे ऋषभदेव नाव ठेवणे हे वर्णन आहे.

पंधराव्या सर्गात ऋषभदेवाच्या शारीरिक सौंदर्याचे वर्णन आहे. सोळाव्या सर्गात भरत व बाहुबलीचे अर्थात आदिनाथाच्या पुत्राच्य जन्माचे वर्णन आहे.

सतराव्या सर्गात ऋषभदेवाच्या विरक्तीचे वर्णन आहे. आठराव्या सर्गात ऋषभदेवाच्या तपाचे वर्णन आहे. एकोणीसाव्या सर्गात नमि-विनमिला विजयार्ध पर्वताच्या नगरीचा परिचय करुन दिला.

विसाव्या सर्गात तपश्चर्येनंतर श्रेयांसच्या घरी घेतलेल्या आहाराचे वर्णन. एकविसाव्या पर्वात ध्यानाचे, बाविसाव्यात ज्ञानप्राप्तीचे, तेविसाव्यात इंद्राद्वारे ऋषभदेवाची स्तुती आणि चोविसाव्या पर्वात भगवंताच्या दिव्य ध्वनिचे वर्णन, पंचविसाव्या पर्वात चक्ररत्न , सव्वीसाव्या पुत्रोत्सव वर्णन केले आहे. सत्ताविसाव्या पर्वात गंगा व वनशोभेचे वर्णन केले आहे. अठ्ठाविस ते शेहचाळीस सर्गा पर्यंत भरत चक्रवर्तीचा विजय, लवण समुद्रापर्यंत, जय, भरत, बाहुबली युध्द्वर्णन राजनीती , वर्णाश्रम वर्णन, ऋषभदेवाचे कैलास पर्वतावर निर्वाण इत्यादी घटना सुत्रे कथेत आहेत. (३२)

What is classic ? या प्रबंधाने, थॉमसन इलिएट या टिकाकारानी आणि कविंनी अभिजात साहित्य म्हणजे काय ? या विषयी चर्चा केली आहे. West land हे काव्य त्यांच्या विद्वत्तेचे बहुभाषीवृत्तीचे एक भक्कम उदाहरण आहे. विविध धर्म, संस्कृती , पंथ, भाषा यांचे दर्शन West land या खंड काव्यात वाचावयास मिळते.

एलिएट यांनी भारतीय पुराणे, वेद, उपनिषद या विषयी बरेच सांगितले आहे. West land काव्यात इंग्रजी मुख्य भाषा वापरुन फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन , चीन, जपान, हिंदुस्थान इत्यादि देशातील साहित्यातील शब्दांचा उपयोग केला आहे. ओ s s म् शांती या संस्कृत शंब्दानी काही

कडवी पूर्ण होतात. हिब्रु भाषेचे त्यांना ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील कांही शब्दांचा वापर करुन माणुसकी व प्रेमाने जग जिंकता येते. असा उल्लख केला आहे. अभिजात साहित्य कोणते ? ते केंव्हा निर्माण होते ? त्यावेळी सामाजिक स्थिती कशी असेल ? त्याला अभिजात का म्हणावे ? या प्रश्नांची उत्तरे एलिएटने अशी दिली की, जे साहित्य काळावर मात करते ते अभिजात साहित्य होय. आजच्या समाजात अभिजात साहित्याची निर्मीती होत नाही. याचे दु:ख एलिटला आहे. तो म्हणतो, "Art and literature can not flourish in a word where men are increasingly becoming machines and society a rocket." (३३)

सांस्कृतीची परिपक्वता ज्यावेळी भाषेचा पूर्ण विकास झालेला असतो त्यावेळी पहावयास मिळतो. अभिजात साहित्य निर्मीतीला तत्कालिन स्थिती कारण असते. सतराव्या शतकात शेक्सपिअर सारख्या प्रतिभासंपन्न नाटककार निर्माण व्हावा आणि त्यांने आपल्या कला कृतीतून निती, न्याय याचा सुरेख संगम दाखवला आहे.

आजही कालिदास, ज्ञानेश्वरांची कलाकृती वाचली जाते. ज्ञानेश्वराने मराठी साहित्यात आपली अशी थोर परंपरा निर्माण करुन ठेवली आहे. ज्ञानेशाच्या बोधगंगेचा शुध्द प्रवाह महाराष्ट्र भूमीतून अजिबात लुप्त झाला नाही. अशा थोर व्यक्तीत्व तत्कालीन समाज स्थिती याच्यातील परस्पर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संबध यांची योग्य रितीने संगती लावली तरच त्यांच्या अमृतवाणीचे रहस्य आपल्याला कळू शकेल [३४]

मी शोध घेत असलेल्या आदिपुराणावरुन व इतर पुराणावरुन, साहित्यीकाच्या विचारातून माझे असे मत झाले की, सर्व प्राचीन साहित्य आत्मानंदाकडे किंवा ब्रम्हानंदाकडे नेणारे शाश्वत सुख देणारे आहे. त्यातील शब्द रचना, त्यातील गोडवा, त्यातील अलंकार, शास्त्र व व्याकरण सर्वच काही अलौकिक आहे.

सर्व पुराणांचा अभ्यास करणारे पांडुरंग काळे यांनी अलौकिक साहित्य निर्माण केले. ते म्हणतात. अलौकिक साहित्य निर्माण करणारे महापुरुष ऋषी, मुनी असले पाहिजेत. जो महापुरुष अथवा ऋषी नाही तो महाकाव्य लिहू शकत नाही. पुराण हे महाकाव्यच आहे. पुराणामधून समाज, सामाजिक व धार्मिक परंपरा, रुढी, नितीशास्त्र, कायदा, राजकीय परस्थिती ,कला, या सर्वांचे दर्शन घडत असते.

मॅक्समुलर यांनी पुराणाचा अभ्यास केला. पुराणाचा संबध वेद पूर्वकालातील अवैदीक संस्कृतीशी सांगितला त्यांच्यामध्ये इतिहास पुराणांची सुरुवात अथर्व वेदांपासून होते. मॅक्समुलरना जैन मताचे परिशिलन करण्यास अवसर मिळाला नाही. हि मोठी खेदाची गोष्ट होय. त्यानी आपले आयुष्य वैध्दिक व बौध्द वाङ्मय प्रगट करण्यात खर्च केले. त्यामुळे त्यांना

जैन धर्म साहित्य पहायला वेळ मिळाला नाही. असेही जैन विद्वान अरोप करतात. (३५)

पुराणाचा व राजकीय संबध असल्याचे कौटिल्याच्या अर्थशास्त्रात उल्लेख येतो. प्राचीन काळापासून राजकारण व पैसा याचा संबध कसा आहे. हे कौठिल्यांने पुराणातील विविध कंथाच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे. पुराणातील भाषा अलंकारीक असल्याने ती कांही अंशाने जड आहे. संस्कृतनिष्ट असल्याने त्यांच्यातील सौंदर्य टिपणाला क्लिष्ट असल्याने पुराणा विरुध्ही टिका केली जाते.

मॅक्समुलर, अरनॉल्ड, टायन्बी यांच्या मते सर्व पुराणे, कथा व निती यांचे सागर आहे.

अष्टादशपुराणे। तियेची मणिभुषणे ।

पद्पध्दती खेवणे । प्रमेय रत्नांची । (३६)

असा स्पष्ट निर्वाळा ज्ञानदेवांनी देऊन पुराणाचा गौरव केला आहे. ज्ञानदेवांच्या पूर्वकाळात होऊन गेलेल्या कविने पुराणाचा संदर्भ देऊन त्यातील कथा या केवळ नितीवर नाहीत. तर निती , तत्वज्ञान याची सुरेख उदाहरणे आहेत. निष्ठा वश्रध्दा यातून पुराणाचे वाचन केल्यास त्यांची रुची वाढते. पुराणे केवळ निती, समाजशास्त्र, मानसशास्त्र, तत्वज्ञान यातूनच पहावयाचे नाही तर साहित्याला लाभलेले योगदान आहे असे मानले आहे.

शाहिरी वाङ्मयात पुराणातील वांगी पुरात असा शब्द प्रयोग केला असला तरी त्याचा अर्थ असा नाही. राम जोशी, पठ्ठे बापूराव या कविंनी आम्हा शाहिरांची हि सरिता आहे. त्यातील अमृत प्राशन करुन समाजाला खरेखुरे दर्शन घडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ग.दि. मांडगुळा सारखे साहित्यीक किंवा बौध्द साहित्यातील जातक कथा लिहीणारे कथाकार या पुराण साहित्याचा आवर्जून नम्रतेने उल्लेख करतात.

पुराण कथा निर्मीतीचे रहस्य् आणि काळ यांचा विचार अलिकडच्या काळात समाजशास्त्रज्ञ व मानवी इतिहासाचे भाष्यकार वेंकटेश केतकर यांनी पुराण कथांचा तर्क शुध्द विचार करुन, अभ्यास करुन प्रश्न निर्माण केले, जग कुणी निर्माण केले? भुकंप ,धरणीकंप का होतात ?, सुर्य का फिरतो ?, या संदर्भात केतकरांनी त्याचे महत्व लोकांसमोर उभे केले. आदिनाथ माता मरुदेवी, महावीर माता त्रिशल्ला यांना पडलेली सोळा स्वप्ने व त्यांचे पृथ्थकरणकेवळ मानसशास्त्रज्ञाना किंवा समाजशास्त्रज्ञाना आव्हानी आहेत असे नाही तर ललित कला लेखकांना देखील त्याविषयीचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

डॉ. केतकरांनी पुढे असे विचार मांडले की, प्राचीन मानवाने पुराण कथा निर्माण केल्या. विविध पदार्थांच्या अवस्था कशा अस्तित्वात आल्या याचे स्पष्टीकरण करणे हा या पुराण निर्मीतीचा भाग आहे. काही विचारवंताचे असे मत आहे की, आधीच निर्माण झालेल्या कर्मकांडांच्या समर्थनार्थ पुराणाची निर्मीती झाली. प्राचीन साहित्यात विविध उत्सवाचे, याञाचे,देवदेवतांच्या मोहत्सवांचे वर्णन आहे. यज्ञ पुजा, नवस यातून निर्माण झालेल्या कथा आणि त्यांचे स्टष्टीकरण देण्यासाठी पुराण कथांची निर्मीती झाली असे मानले गेले आहे. सर्वसामान्य माणसाला धार्मिक विचाराचे, आचाराचे, शुभ-अशुभाचे, निती - अनितीचे महत्व समजण्यासाठी केवळ बुध्दी इंद्रिये यांचा उपयोग होत नाही. तर पुराण कथेने त्याचे महत्व वाढते. (३७)

पुराणकथांवर आजुबाजूच्या वातावरणाचा, परिस्थितीचा, नैसर्गिक गोष्टीचा विशिष्ट प्रदेशाचा परिणाम पहावयास मिळतो. अरण्यात राहणारे भिल्ल, गोंड, संथाळ, अरण्य देवाची पुजा करतात. उन, वारा, पाऊस, सूर्य, चंद्र, वर्षात निर्माण होणारी पिके इत्यादी गोष्टींशी अनेक कथा निगडीत आहेत. त्याप्रमाणे आदि मानव हा शिकार करत असे, त्याप्रकृतीशी निगडी त असलेया पशुकथा आजही अत्यंत रोचक म्हणून मानल्या गेल्या आहेत. मासे, जलपऱ्या यातून निर्माण झालेल्या मत्स्य कथा आजही आवडीने वाचल्या जातात. परंतू ज्याकाळात, ज्या आवस्थेत निर्माण झाल्या त्या

आवस्थेचा व भोवतीच्या परिस्थितीचा परिणाम झाला आहे. प्रत्येक पुराण कथाही त्या युगाचा , वंशाचा, परिस्थितीचा घटक आहे.

टेनचे सुत्र अनेक नामवंत टिकाकाराने स्विकारले असून त्याला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. पुराण कथांचा व कर्मकांडाचा सबंध लक्षात घेण्यासारखा आहे. अलिकडच्या काळात धर्मशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांच्या परस्पर विचारातून पुराणकथातील कर्मकांडाचा नव्या दृष्टीने विचार करण्यात आला आहे. पुराण कथेशिंवाय कर्मकांड पुर्ण होत नाही. अलिकडे पुराण कथा कर्मकांड यांचा संबध क्षीण होत चालला आहे.

'पुराणकथा कशा रितीने लोकांना सांगाव्यात ? ' याचा एक आदर्श मोरोपंतासारख्या पंतकवीनी लोंकासमोर ठेवला आहे.शब्दालंकार , अर्थालंकार, रसपरिपोष इत्यादी सर्व साहित्य प्रतिभा गुणांचा अविष्कार करित असतांना सत् संस्कार घडवावेत हे या काव्य कथांचे रहस्य् आहे. (३८)

प्रकरण १

प्रास्ताविक –

संदर्भ

१) क्षिरसागर ज. ने., अनुवादक 'आर्यामहापुराण' , महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे पृ. क्र. १५
२) पंडिता सुमतीबाई शहा, मुख्यसंपादक व मंडळ, 'पुर्णार्घ्य' (जैन ज्ञान कोष), पी. एस. विद्यापीठ ट्रस्ट, प्रकाशन – सोलापूर. पृ. क्र. २४१
३) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. २४२
४) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. २४३
५) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. २९८
६) डॉ. पन्नालाल जैन, संपादक + अनुवादक, जिनसेनाकृत 'आदिपुराण' भारतीय विद्यापीठ प्रकाशन, नविदिल्ली, पृ. क्र. २०
७) डॉ. पी. सी. जैन, 'हरिवंश पुराण का सांस्कृतिक अध्ययन'देवनागर प्रकाशन,जयपुर. पृ.क्र १
८) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. ३६५
९) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. ३६६
१०) महावीर कंडारकर , 'पद्मपुराण' पद्म प्रकाशन, बारामती. पृ. क्र. १४
११) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. ३००
१२) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. २९८
१३) डॉ. सौ. सिंधू सं. डांगे, 'भारतीय साहित्याचा इतिहास', भाग १ ला., महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ, निर्मीती मंडळ, मंगल प्रकाशन, नागपूर . पृ. क्र. ३६
१४) **William Benton, 'Encyclopaedia Britannica Vol. 11th edition P. No. 128**
१५) कित्ता, 'पुर्णार्घ्य', पृ. क्र. ३६५
१६) डॉ. प्रभाकर देव, रमेश कांबळे, 'आशिया खंडातील राष्ट्रवाद' , य. च. म. मु. वि., नाशिक प्रकाशन. पृ. क्र. ४६.
१७) कित्ता, 'आशिया खंडातील राष्ट्रवाद', पृ. क्र. २
१८) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. १
१९) कित्ता, 'आर्यामहापुराण', पृ. क्र. ३३
२०) कित्ता, 'आर्यामहापुराण', पृ. क्र. ३४
२१) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. २७
२२) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ४०
२३) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ४१
२४) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ०२
२५) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ३४

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२६) कित्ता, 'आदिपुराण', पृ. क्र. ३५
२७) कैलासचंद्र शास्त्री, 'जैन धर्म', तिरुपती प्रिंटर्स, सुपर मार्केट, सोलापूर. पृ. क्र. १२
२८) कित्ता, 'पुर्णार्घ्य' , पृ. क्र. २९८
२९) कित्ता, 'पुर्णार्घ्य' , पृ. क्र. ३००
३०) कित्ता, 'पुर्णार्घ्य' , पृ. क्र. ३०१
३१) कित्ता, 'पुर्णार्घ्य' , पृ. क्र. ३६६
३२) कित्ता, 'पुर्णार्घ्य' , पृ. क्र. ३६७
३३) एलीयट टी. एस्. **'West Land'**
३४) सोनालीकर ह. श्री., 'ज्ञानेश्वराची अमृतवाणी', प्रा. दा. ना. मोघे, स्कुल / कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर. पृ. क्र. ०२
३५) शहा रावजी नेमचंद कुरुलकर, 'जैन धर्मादर्श', पृ. क्रं. ४९
३६) वि. वा. राजवाडे, 'ज्ञानेश्वरी' , दांडेकर ज्ञानेश्वरी मंडळी, मु. शं. से. प्रेस पृ. क्र. ०१
३७) केतकर श्री. व्य., 'भारतीय समाजशास्त्र आगि अंतर्गत समाज घटना शास्त्राचे विधान', सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर. पृ. क्र. २५
३८) अच्युत चिंतामण भट, 'मोरोपंतांचे समग्र ग्रंथ', अ. चि. भ. यशवंत छापखाना, पुणे.